0 7 APR 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचे सर्व आर्थिक व्यवहार 'ऑनलाईन'



**कोल्हापूर : जमास्वीकृती विभागात संगणक सुविधेद्वारे प्रथम ऑनलाईन आर्थिक व्यवहार करणाऱ्या विद्यार्थिनीस कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते पावती प्रदान केली. या वेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील उपस्थित होते.**

कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागांतर्गत कार्यरत जमास्वीकृती कक्षाच्या इतिहासात बुधवार (ता. ५) हा महत्त्वाचा ठरला. सर्व (१०० टक्के) व्यवहार ऑनलाईन झाले. या निमित्ताने कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी जमास्वीकृती विभागात जाऊन सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली वित्त व लेखा विभागाने विद्यार्थ्यांसह विविध घटकांच्या सोयीसाठी ऑनलाईन रिसीट पोर्टलची निर्मिती केली. त्या अनुषंगाने अधिकार मंडळाच्या ठरावानुसार सर्व अधिविभागांद्वारे विद्यापीठाच्या जमास्वीकृती विभागात रोखीने, धनादेशाद्वारे तसेच बँक पावतीद्वारा केल्या जाणाऱ्या पावत्या ३१ डिसेंबर २०२२ पासून, तर ३१ जानेवारी २०२३ पासून महाविद्यालये आणि इतर घटकांसाठी बंद केल्या. सर्व संबंधितांना ऑनलाईन रिसिट पोर्टलचा वापर करूनच सर्व व्यवहार आणि पावत्या ऑनलाईन करण्याबाबत सांगण्यात आले. त्यानुसार बुधवारी सर्व व्यवहार आणि पावत्या ऑनलाईन स्वरुपात झाले. विद्यापीठात येऊन व्यवहार करू इच्छिणाऱ्यांसाठी जमास्वीकृती विभागात पाच संगणक उपलब्ध केले आहेत. या सुविधेचा प्रारंभ कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या उपस्थितीत झाला. कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, महादेव देशमुख, तानाजी चौगुले, रमेश लिधडे, सुरेश बंडगर, सुभाष संकपाळ, सतीश हुक्केरी, शोभा पुरेकर, वंदना गुरव, जयश्री माने, सुजीत सकटे, दीपा चौगुले, रुपाली सणगर, काजल मधाळे, विकास सावंत उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
07 APR 2023
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचे सर्व आर्थिक व्यवहार झाले 'ऑनलाइन'

## जमास्वीकृती विभागाच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण दिवस

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागाअंतर्गत कार्यरत जमास्वीकृती कक्षाच्या इतिहासात बुधवारचा दिवस (दि. ५ एप्रिल) ऐतिहासिक महत्त्वाचा ठरला. या कक्षामधील सर्व व्यवहार १०० टक्के ऑनलाइन झाले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह सर्वच अधिकाऱ्यांनी या विभागातील सर्व कर्मचाऱ्यांचे प्रत्यक्ष अभिनंदन केले.

शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली वित्त व लेखा विभागाने विद्यार्थ्यांसह विविध घटकांच्या सोयीसाठी ऑनलाइन रिसीट पोर्टलची निर्मिती केली. त्याअनुषंगाने अधिकार मंडळाच्या ठरावानुसार विद्यापीठ परिसरातील सर्व अधिविभागांद्वारे जमास्वीकृती विभागात रोखीने, धनादेशाद्वारे, तसेच बँक पावतीद्वारा केल्या जाणाऱ्या पावत्या दि. ३१ डिसेंबर २०२२ पासून बंद होत्या. ३१ जानेवारीपासून महाविद्यालये व इतर घटक यांच्याकरिता या सुविधा बंद करण्यात आल्या. दि. ४ एप्रिलपर्यंत ही व्यवस्था प्रायोगिक तत्त्वावर यशस्वी केली. ५ एप्रिल रोजीचे सर्व व्यवहार आणि पावत्या ऑनलाइन स्वरूपातच झाले.

कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यविद्या विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, उपकुलसचिव रमेश लिधडे, सहायक कुलसचिव सुरेश बंडगर, अधीक्षक सुभाष संकपाळ, सतीश हुक्केरी, शोभा पुरेकर, वंदना गुरव, जयश्री माने, आदींच्या उपस्थितीत कुलगुरूंनी या विभागाचे अभिनंदन केले.

### मोबाइलवरूनही व्यवहार



कोणताही व्यवहार प्रत्येक विद्यार्थी कोणत्याही ठिकाणाहून संगणक अथवा मोबाइलवरून ऑनलाइन स्वरूपात करू शकणार आहे. तथापि, विद्यापीठात येऊन व्यवहार करू इच्छिणाऱ्यांसाठी जमास्वीकृती विभागामध्ये पाच संगणक उपलब्ध करण्यात आले आहेत.

पुढारी

# पापड विकणाऱ्या महिलेचे दातृत्व!

## महावीर अध्यासनास मंगला लिंबेकर यांच्याकडून देणगी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनाच्या इमारतीसाठी मंगला लिंबेकर यांनी पापड विकून परिश्रमाने मिळवलेल्या पैशातून देणगी दिली आहे. त्यांनी दाखवलेल्या दातृत्वाचे कौतुक होत आहे.

लिंबेकर या भगवान महावीर अध्यासनाच्या विद्यार्थिनी आहेत. चरितार्थ चालविण्यासाठी त्या पापड विकून उत्पन्न मिळवतात. परिस्थिती गरिबीची असली तरी त्यांनी कष्टातून मिळालेल्या पैशाचे दान देण्याचा महत्त्वाचा दानशूरपणा दाखवत एक हजार शंभर रुपयांची देणगी विद्यापीठाच्या महावीर अध्यासनास दिली आहे. कुवतीपेक्षा दातृत्वाची भावना महत्त्वाची असते, हे या निमित्ताने आधोरेखित झाले आहे. देणगीबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अध्यासन समन्वयक डॉ. विजय काकडे यांनी आभार मानले आहेत.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ भगवान महावीर अध्यासनाच्या इमारत बांधकामास देणगी डॉ. विजय काकडे यांच्याकडे सुपूर्द करताना मंगला लिंबेकर व त्यांचे कुटुंबीय.**

0 7 APR 2022
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरूण भारत

# महावीर अध्यासनाला मंगला लिंबेकर यांच्याकडून देणगी

प्रतिनिधी
कोल्हापूर

मंगला लिंबेकर या भगवान महावीर अध्यासनाच्या विद्यार्थीनी असून पापड विकून त्या आपला उदरनिर्वाह करतात. हालाखीच्या परिस्थितीतही आपल्या कष्टातून त्यांनी भगवान महावीर अध्यासनासाठी एक हजार शंभर रुपयांची देणगी दिली आहे. देणगीसाठी कुवतीपेक्षा दातृत्वाची भावना महत्त्वाची असते हे या निमित्ताने आधोरेखित झाले आहे.

या देणगीबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी लिंबेकर यांचे आभार मानले. भगवान महावीर अध्यासनाच्या इमारत बांधकामासाठी दानशूरांनी मदत करावी, असे आवाहन डॉ. विजय ककडे यांनी यावेळी केले आहे.

लोकमत

# लोकहिताला प्राधान्य द्या : विवेक भावसार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : पत्रकारांनी माहितीसोबत डेटा संकलनावर भर दिला पाहिजे. डेटावर प्रक्रिया करून त्यातून वेगळी बातमी वाचकापर्यंत पोहोचवली पाहिजे, असे मत मुंबई येथील वरिष्ठ पत्रकार विवेक भावसार यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात भावसार यांचे ऑनलाईन व्याख्यान झाले. भावसार म्हणाले, की एकसारख्या पारंपरिक बातम्या देणे स्पर्धेच्या युगामध्ये सयुक्तिक ठरणार नाही. वाचकांची आवड बदललेली आहे. त्यानुसार वार्तांकन करणे आवश्यक आहे. पत्रकारांनी लोकहिताला प्राधान्य दिले पाहिजे, तसेच पत्रकारांनी तटस्थ वार्तांकन केले पाहिजे. अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रस्ताविक केले. व्हिज्युअल स्टोरी टेलर आणि फोटो जर्नालिस्ट अभिजित गुर्जर यांनी ओळख करून दिली.

पुढारी

# विद्यापीठाकडून ३७१ परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ परीक्षा विभागाकडून हिवाळी सत्र परीक्षेंतर्गत आजअखेर सुमारे ३७१ परीक्षांचे निकाल घोषित झाले आहेत. विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा व्यवस्थितपणे सुरू आहेत. गुरुवारी बीएस्सी., बीए., एमए (डिप्लोमा इन टॅक्सेशन) या अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालये, अधिविभागामध्ये सुरळीतपणे पार पडल्या. दरम्यान, गुरुवारी एमसीए, बीबीए, मास कम्युनिकेशन, बीएस्सी (संगणकशास्त्र), बी.व्होक आदी १३ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत. आजअखेर ३७१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

07 APR 2023 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाने 'मैदान' मारले

## राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळाडूंची बाजी, ७५ पदकांची कमाई

**कोल्हापूर : अनुराधा कदम**

कोल्हापूर म्हटले की खेळाचा आखाडा आलाच. छत्रपती शाहू महाराजांनी पाठबळ दिलेल्या कोल्हापूरच्या खेळाने आणि खेळाडूंनी जगात नाव कमावले आहे. कोल्हापूरची ही खेळात शड्डू ठोकण्याची परंपरा शिवाजी विद्यापीठानेही कायम राखली आहे. यंदा शिवाजी विद्यापीठातील खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय खेळात असे काही मैदान मारलेय की, ७५ पदकांची कमाई केली.

गेल्या ६० वर्षांत यंदा प्रथमच विद्यापीठाने ॲथलेटिक्स क्रीडा प्रकारात सर्वसाधारण विजेतेपदावर नाव कोरले आहे. हा सन्मान अर्थातच खेळाडूंच्या मेहनतीने मिळाला आहे. या स्पर्धेत देशातील दिग्गज संघ सहभागी



झाले होते. या विजेतेपदावर दावा करणाऱ्या देशातील कसलेल्या संघांना मागे टाकत खेळाडू विद्यार्थ्यांनी ६० व्या वर्षी विद्यापीठाच्या यशात मानाचा तुरा रोवला आहे. साऊथ वेस्ट आणि ऑल इंडिया झोनमध्ये तब्बल ३८ मेडल्स मिळवून विद्यापीठाच्या खेळाडूंनी केलेली ही कमाई कौतुकाची धनी ठरली. ऑल इंडिया बॉडीबिल्डिंग क्रीडा प्रकारातही विद्यापीठाच्या नावावर सर्वसाधारण विजेतेपदाची मोहोर उमटली आहे. क्रॉसकंट्री, वेटलिफ्टिंग, मल्लखांब, नेमबाजी या खेळात यंदा शिवाजी विद्यापीठ अव्वल ठरले आहे.

> “ यंदा शिवाजी विद्यापीठाला ६० वर्षे होत आहेत. या पार्श्वभूमीवर खेळाडूंनी मिळवलेले यश अभिमानास्पद आहे. देशपातळीवर अव्वलतेचा दावा करणाऱ्या संघांना शिवाजी विद्यापीठाने चितपट केले आहे. भविष्यात खेळाडूंना अधिकाधिक सुविधा देण्यासाठी विद्यापीठ प्रोत्साहन देणार आहे.
>
> – प्रा. शरद बनसोडे, क्रीडा अधिकारी, शिवाजी विद्यापीठ

### आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकले ८ खेळाडू

शिवाजी विद्यापीठाने आंतरराष्ट्रीय मैदानात चमक दाखवली आहे. ॲथलेटिक्स, सॉफ्टबॉल, रग्बी, खो खो या खेळात विद्यापीठाचे नाव जगाच्या मैदानावर घुमले. या वर्षी विद्यापीठाचे ८ खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर विजेते झाले. यामध्ये ५ मुली, तर ३ मुले आहेत. विद्यार्थिनींचा टक्का मैदानावरही गाजला आहे.

### ७४ पदकांसह राज्यात प्रथम

राष्ट्रीय स्तरावर यंदा विद्यापीठाने खेळात मारलेली बाजी कौतुकास्पद ठरली आहे. यामध्ये १६ सुवर्णपदके, २६ रौप्यपदके, तर ३२ कास्यपदकांची लयलूट केली आहे. पारंपरिक खेळाबरोबरच नव्या खेळांमध्येही विद्यापीठाचे विद्यार्थी देशपातळीवर कौशल्य सिद्ध करत आहेत. महाराष्ट्रातील आंतरविद्यापीठीय क्रीडामहोत्सवात महाराष्ट्रात प्रथम येण्याचा मानही शिवाजी विद्यापीठालाच.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

07 APR 2023
पुण्यनगरी



भोवताल

# वडाचीच पूजा व्हावी!

डॉ. व्ही.एन. शिंदे

भारतीय सण, प्रथा, परंपरा निसर्गावर प्रेम करायला शिकवतात. निसर्गातील प्रत्येक घटकाचे महत्त्व लक्षात आणून देतात. निसर्गात परस्परावलंबी अनेक साखळ्या आहेत. यात अनेक वृक्ष, प्राणी, जीवांचे मानवालाही सहकार्य मिळते. गांडूळ आणि सापाला शेतकऱ्यांचे मित्र मानतात. या परस्पर सहकार्याचे प्रतिबिंब प्रथा, परंपरा आणि सणामागे दिसते. लोकांनी निसर्गातील जैवविविधतेला जपण्यास प्रवृत्त व्हावे, हा अशा सणामागचा हेतू असावा. नागपंचमीला सापाची, बैलपोळ्याला बैलांची, आवळा पौर्णिमेला आवळा वृक्षाची पूजा, गुढीपाडव्याला कडूनिंब महत्त्वाचा, तर दसऱ्याला आपटा. प्रत्येक सण, प्रथा आणि परंपरेसोबत कथाही जोडल्या गेल्या आहेत. विविध घटकांचे मानवी जीवनातील महत्त्व लक्षात आणून देणे आणि त्या घटकाची उपलब्धता भविष्यात व्हावी, म्हणून त्यांचे जतन केले जावे असा हेतू यामागे असावा.

मात्र, प्रत्यक्षात तसे घडत नाही. अनेक सण, प्रथा आणि परंपरामध्येही शॉर्टकट घुसले आहेत. त्यामुळे त्यामागील वैज्ञानिक कारण जाऊन आज निव्वळ सोपस्कार पार पाडले जातात. त्याचा परिणाम पर्यावरणावर होतो. निसर्गाचे मोठे नुकसान होते. पूर्वी गावात एकच होळी पेटायची, आज दारादारात पेटते. अनेकदा डांबरी रस्त्यावर ती पेटवल्याने हवेच्या प्रदूषणाबरोबर, डांबरी रस्त्याचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होते. रंगपंचमीला पाण्याची होणारी नासाडी उघड्या डोळ्यांना पाहवत नाही. इंधनाचे नुकसान, हवेचे प्रदूषण आणि पायाभूत सुविधांचे होणारे नुकसान मनाला अस्वस्थ करते. गुढीपाडवा साजरा करतानाही कडूलिंबांच्या डहाळ्यांचे असेच नुकसान होते. गरजेपेक्षा जास्त फांद्या मोडल्याने झाडाचे नुकसान होते. त्या फांद्या वाढण्यास वर्ष किंवा कदाचित त्यापेक्षाही जास्त काळ लागतो. मात्र, त्याचा विचार कधीच होत नाही.

काही दिवसांत महिलांचा महत्त्वाचा सण येईल. वटसावित्री पौर्णिमा! ज्येष्ठ महिन्याच्या पौर्णिमेला हा सण साजरा होतो. यामागेही एक पौराणिक कथा आहे. फार-फार वर्षांपूर्वी अश्वपती नावाचा भद्र देशाचा राजा होता. त्याला सावित्री नावाची अत्यंत सुंदर, नम्र आणि गुणी मुलगी होती. राजाला आपल्या कन्येवर मोठा विश्वास होता. ती विवाहायोग्य होताच राजाने तिला आपला पती निवडण्याचे स्वातंत्र्य दिले. सावित्रीने सत्यवान नावाच्या राजकुमाराची निवड केली. हा सत्यवान शाल्व देशाचा राजा धृमसेनाचा मुलगा. मात्र, धृमसेन अंध होता. त्याचे राज्य दुसऱ्यानी बळकावले होते. त्यावेळी ते राज्यातून परागंदा होऊन जंगलात राहात होते. नारदमुनीना माहीत होते की, सत्यवानाचे आयुष्य केवळ एक वर्षाचे आहे. नारदमुनींनी, सावित्रीने अशा अल्पायुषी सत्यवानाशी विवाह करू नये असे सुचवले. मात्र, सावित्रीने त्याचीच निवड केली. केवळ एक वर्षाचे आयुष्य असणाऱ्या सत्यवानाशीच विवाह केला. आपल्या कन्येची इच्छा राजा अश्वपतीने पूर्ण केली. लग्नानंतर सावित्री सत्यवानासोबत जंगलात राहू लागली. सासू-सासऱ्याची सेवा करू लागली. सत्यवान जंगलात लाकडे तोडून विकत असे आणि उदरनिर्वाह चालवत असे.

सत्यवानाच्या मृत्यूला तीन दिवस उरले असताना, सावित्रीने उपवास सुरू केला. अखेर त्याच्या मृत्यूचा दिवस उगवला. सावित्री त्याच्यासोबत जंगलात गेली. नियोजित वेळी यम सत्यवानाचे प्राण घेऊन निघाला. सावित्री त्यामागे जाऊ लागली. अनेकदा यमाने तिला परत जायला सांगितले, पण सावित्रीने काही ऐकले नाही. शेवटी यमाने तिला सत्यवानाचे प्राण सोडून तीन वर मागायला सांगितले. सावित्रीने प्रथम सासू-सासऱ्यांचे डोळे मागितले. दुसऱ्या वरामध्ये त्यांचे राज्य आणि तिसऱ्या वरामध्ये एक पुत्र मागितला. सावित्रीला कटवायच्या नादात, यमाने घाईमध्ये 'तथास्तु' म्हटले. नंतर त्याच्या चूक लक्षात आली. सावित्रीला पुत्र होण्यासाठी यमाला सत्यवानाचे प्राण परत द्यावे लागले. तेव्हापासून पतीला चांगले आरोग्य, दीर्घायुष्य लाभावे म्हणून हे व्रत करण्याची प्रथा सुरू झाली. आता जन्मोजन्मी, सात जन्म हाच पती मिळावा म्हणून महिला वटवृक्षाची पूजा करतात.

वडाचे झाड दीर्घायुषी आहे. त्याला पारंब्या येतात. प्रत्येक पारंबीपासून एक नवे झाड तयार होते. हे झाड अनेक जीवांचे घर असते. अनेक पक्षी यावर घरटी बांधतात. वडाच्या झाडाचा जसा विस्तार होतो, तसे कुटुंब विस्तारावे अशीही धारणा आहे. वडाच्या मुळ्या भूजल शुद्धीकरणात उपयुक्त असतात. पाने पसरट आणि गर्द असल्याने सावली चांगली मिळते. जास्त कार्बन डाय ऑक्साईड शोषून ऑक्सिजन निर्मिती करतात. झाडाची पाने जनावरांना चारा म्हणून उपयुक्त असतात. त्यामुळे तसा मानवाला याचा कोठेही प्रत्यक्ष उपयोग नाही. तरीही वडाच्या झाडांना मानवाने जपावे, ती लावावीत, वाढवावीत या हेतूने वडाला या व्रताशी जोडले असावे. वड, पिंपळ यासारखी झाडे जणू काही एका गावासारखी असतात. अशा झाडांबरोबर एक परिसंस्था निर्माण झालेली असते. त्यामुळे त्यांचे निसर्गातील महत्त्व फार मोठे आहे.

ही घटना वटवृक्षाखाली घडली म्हणून वटसावित्री पौर्णिमेला वडाच्या झाडाची पूजा होते. वडाची लाकडे जळण म्हणून वापरली जात नाहीत. त्यामुळे गावकऱ्यांकडून या झाडाची तोड करण्यात येत नाही. वडाची झाडे रस्त्याकडेला मोठ्या प्रमाणात लावण्यात आलेली होती. मात्र, रस्ता रूंदीकरणात यातील झाडांची मोठ्या प्रमाणात तोड झाली आहे. वडाच्या झाडांची लाकडे डांबर वितळवण्यासाठी वापरण्यात येतात. पूर्वी गावाच्या वेशीत, मुख्य चौकात वडाचे एक तरी झाड असायचे. आता अशा झाडांची संख्या कमी झाली आहे. त्यामुळे हे व्रत पाळायचे तर खूप दूर जावे लागते. महानगरात तर अवघडच. म्हणून शॉर्टकट- वटपौर्णिमेदिवशी वडाच्या फांद्या विकण्याचा गोरखधंदा सुरू झाला. अनेक घरात वडाची फांदी विकत आणून पूजा करतात. पूजा ही वैयक्तिक बाब, तिला आक्षेप असण्याचे कारण नाही. झाडाची पूजा करण्याची परंपरा आहे, वडाला मुळ्या आणि पारंब्या असतात. फांदीला ना मूळ ना पारंब्या. मग हे व्रत खरंच शास्त्रानुसार होते का?

आज रूढी-परंपरांच्या नावाखाली झाडांची कत्तल होते. झाडाचे नुकसान होते. कापलेल्या सर्व फांद्या विकल्याही जात नाहीत. राहिलेल्या फांद्यांचे ढीग बाजारात आणि रस्त्यावर पडतात, म्हणजेच कचरा वाढतो. सण साजरे करताना निसर्गाची, पर्यावरणाची हानी होणार नाही याची काळजी घ्यायला हवी. फांद्यांऐवजी दारात एका कुंडीत वडाची फांदी लावावी. वडाच्या फांदीला लगेच मुळ्या फुटतात. फांदी आणून आताच लावली, तर रोप तयार होईल. त्या रोपाची पूजा केली तर ती खऱ्या अर्थाने सार्थकी लागेल. झाडाचा एखादा भाग हवा असेल तर अगोदरच्या दिवशी जाऊन त्या झाडाची क्षमा मागून, झाडाला तो भाग देण्याची विनंती करण्यास भारतीय संस्कृती सांगते. रूढी परंपरा पाळताना याचा विसर न व्हावा इतकेच!

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४००